**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिना दौऱ्यावर, अर्जेंटिनाच्या अध्यक्षांसोबत विविध सामंजस्य करारांची शक्यता

- मराठीच्या मुद्द्यावर एकजूट कायम राखण्याचं राज आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन

- ठाकरे बंधूंच्या मेळाव्यात मराठी ऐवजी सत्तेची लालसा दिसून आल्याची भाजपा आणि शिवसेनेची टीका

- केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते त्रिभुवन सहकारी विद्यापीठाचं भूमीपूजन

**आणि**

- अँडरसन - तेंडूलकर कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताकडे ४०० हून अधिक धावांची आघाडी, शुभमन गिल शतकाच्या उंबरठ्यावर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्युनोस आयर्स इथं अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष हॅविअर मिले यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चा होणार आहे. त्यात व्यापार आणि गुंतवणूक, आरोग्य आणि औषधनिर्माण, संरक्षण आणि सुरक्षा, खाणकाम आणि खनिज संपत्ती यासारख्या मुद्द्यांवर सहकार्य कराराची अपेक्षा आहे.

अर्जेंटिनाच्या भेटीनंतर, ते रिओ दि जानेरो इथं होणाऱ्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझील इथं रवाना होतील. त्यानंतर आपल्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात ते नामिबिया इथं भेट देतील.

**<><><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन राज आणि उद्धव ठाकरे यांनी आज केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे यांच्या भाषणानं या मेळाव्याला सुरुवात झाली. ते म्हणाले

**- होल्ड - राज ठाकरे बाइट -**

राज्यातल्या जनतेला आधी भाषेवरून आणि नंतर जातीपातींमध्ये विभागण्याचा डाव असल्याचा दावा राज ठाकरे यांनी केला. बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे इंग्रजी माध्यमातून शिकले होते, मात्र त्यांच्या मराठीच्या प्रेमावर कुणालाही शंका घ्यायला जागा नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

त्यानंतर भाषणाला आलेल्या उद्धव ठाकरे यांनी भाषणापेक्षा एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे, असं म्हणून सुरुवात केली.

**- होल्ड - उद्धव ठाकरे -**

राजकारण्यांनी आतापर्यंत मराठी माणसांना वापरलं आणि फेकून दिलं. संकटात मराठी माणून एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, या पुढे अशा डावांना बळी पडू नका असं म्हणत सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.

आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत. त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला.

**<><><><><>**

विजयी मेळाव्यात मराठी ऐवजी सरकार गेल्याचं दुःख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केलं, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. गेल्या २५ वर्षात मुंबई महापालिकेत सत्ता असताना ते काहीही करू शकले नाही. तरी त्यांना पुन्हा

सत्ता हवी असल्याचं फडणवीस म्हणाले. दोन्ही भावांना एकत्र आणल्याच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली.

**- होल्ड - मुख्यमंत्री बाइट -**

**- <><><><><>**

ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यात मराठी भाषेच्या आडून द्वेष आणि आगपाखड दिसून आल्याची टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

**होल्ड बाईट - एकनाथ शिंदे**

महाराष्ट्र गीताला राज्यगीताचा दर्जा आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही महायुती सरकारनेच मिळवून दिल्याची आठवणही शिंदे यांनी यावेळी करून दिली.

**<><><><><>**

मराठीच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले ही चांगली बाब असली तरी राजकीयदृष्ट्या त्यांचं मनोमिलन होईल का, हे बघणं महत्त्वाचं असल्याची प्रतिक्रिया अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. ते आज नाशिक इथे पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज गुजरात मध्ये त्रिभुवन सहकारी विद्यापीठ या देशातल्या पहिल्या सहकार विद्यापीठाची कोनशिला बसवण्यात आली. कोट्यवधी गरीब आणि ग्रामीण लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्यासाठी आपलं मंत्रालय वचनबद्ध आहे, देशातल्या सहकार चळवळीत आता सुमारे ४० लाख कामगार जोडले गेले आहेत, असं त्यांनी सांगितलं. हे विद्यापीठ धोरण निर्मिती, डेटा विश्लेषण, सहकार क्षेत्रातले धोरणात्मक निर्णय आणि संशोधन यावर भर देईल, असं शाह म्हणाले.

**होल्ड अमित शहा बाइट (११ सेकंद)**

<><><><>

झारखंडमध्ये, रामगड जिल्ह्यातल्या महुआ तुंगरी इथं आज पहाटे बंद असलेल्या कोळसा खाणीचा एक भाग कोसळून ढिगाऱ्याखाली अडकल्यामुळे चार जणांचा मृत्यू झाला. सेंट्रल कोलफिल्ड लिमिटेड प्रकल्पात बेकायदेशीर खाणकाम सुरू असताना ही दुर्घटना घडली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या एकूण दहा लोकांपैकी सहा जणांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आलं, मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचं प्रशासनानं सांगितलं.

<><><><>

पंजाब नॅशनल बँकेच्या आर्थिक फसवणूक प्रकरणातला फरार आरोपी नीरव मोदी याचा भाऊ नेहल मोदी याला काल अमेरिकेत अटक झाल्याची माहिती अमेरिकेच्या न्याय विभागाने दिली आहे. ईडी आणि सीबीआयने संयुक्तपणे सादर केलेल्या प्रत्यार्पणाच्या विनंतीनंतर ही अटक करण्यात आली. नेहल मोदी याच्यावर मनी लाँड्रिंग आणि गुन्हेगारी कट रचल्याच आरोप आहे.

<><><><>

पाकिस्तानातील कराची इथं ल्यारी भागात काल इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १७ झाली आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि एका लहान मुलाचा समावेश आहे. नऊ जणांची सुटका करण्यात आली आहे, मात्र आणखी २५ ते ३० जण ढिगाऱ्याखाली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

<><><><>

बिजिंगमध्ये सुरू असलेल्या पॅरा-तिरंदाजी आशियाई चॅम्पियनशीप स्पर्धेत भारतीय तिरंदाजांनी दोन सुवर्णपदकं पटकावली. पदकतालिकेत भारताच्या खात्यातल्या पदकांची संख्या सात झाली आहे.

सांघिक खेळात शीतल देवी आणि ज्योती यांनी चीनचा पराभव केला. हरविंदर सिंग आणि भावना यांनी मिश्र स्पर्धेत सुवर्ण पदकाची कमाई केली.

<><><><><>

अमेरिकेच्या १२ निर्यातदार देशांसाठी सीमाशुल्काचे विविध दर सुचवणाऱ्या प्रस्तावांवर आपण स्वाक्षरी केल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. हे प्रस्ताव खुले असतील, आणि ते स्वीकारण्याबाबतचा निर्णय संबंधित देश घेतील असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. येत्या सोमवारी हे प्रस्ताव पाठवले जातील, अशी माहिती त्यांनी दिली. भारतानं अद्याप अमेरिकेबरोबर कोणताही व्यापार करार केलेला नाही. भारत अंतिम मुदतीच्या दबावाखाली कोणताही करार करणार नसून, केवळ राष्ट्रीय हिताचे करार करेल, असं वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अँडरसन - तेंडुलकर चषक क्रिकेट स्पर्धेतल्या, दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ गडी बाद ३०४ धावा झाल्या आहेत. त्यामुळं भारताकडे एकूण ४८४ धावांची आघाडी झाली आहे. पहिल्या डावात द्विशतक ठोकणारा कर्णधार शुभमन गिल यानं या डावात नाबाद शतक ठोकलं. केएल राहुल आणि ऋषभ पंत वेगवान अर्धशतक करुन बाद झाले.

<><><><><>

भारताच्या १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने इंग्लंड मधल्या वॉर्सेस्टर इथं सुरू असलेल्या युवा एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ५२ चेंडूत शकत झळकावलं. त्याने 78 चेंडू खेळत 143 धावा केल्या. 19 वर्षा खालील एकदिवसीय क्रिकेट मध्ये हे आतापर्यंतचं सर्वात वेगवान शतक आहे.

<><><><><>

जागतिक बँकेनं भारताला जगातल्या सर्वाधिक आर्थिक समानता असलेल्या राष्ट्रांमध्ये स्थान दिलं आहे. भारताचा गिनी इंडेक्स किंवा गिनी गुणोत्तर २५ पूर्णांक ५ दशांश असून स्लोवाक प्रजासत्ताक, स्लोव्हेनिया आणि बेलारूस यांच्यानंतर

भारत आर्थिक दृष्ट्या सर्वाधिक समानता असलेला जगातला चौथा देश ठरला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत कुटुंबामागे किंवा व्यक्तींमागे उत्पन्न, संपत्ती आणि व्यय यांचं प्रमाण किती समप्रमाणात वितरित झालं आहे, हे या निर्देशांकातून दिसून येतं.

**<><><><><>**

बिहारचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांनी आज तेराव्यांदा राष्ट्रीय जनता दलाच्या अध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारली. नुकत्याच झालेल्या संघटनात्मक निवडणुकीत त्यांची बिनविरोध निवड झाली.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे आलेला पूर, भूस्खलनाच्या घटनांमध्ये आतापर्यंत ७२ जणांना बळी गेला आहे, तर ३७ जण बेपत्ता आहेत. राज्याच्या आपत्कालीन कार्य केंद्राने ही माहिती दिली. ११३ जण जखमी आहेत तर यंदाच्या पावसाळ्यापासून इथं रस्ते अपघातात २७ जण मृत्यूमुखी पडले आहेत.

**//<><><><><>//**